अस्सल सोलापुरी

सुराज्य
सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरुवार, दि. २५ मे २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : २३५ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

आज बारावीचा निकाल

✔ **पुणे** : काही दिवसांपूर्वी सीबीएसई आणि सीआयएससीईने दहावी-बारावीच्या परीक्षांचे निकाल एकाच दिवशी जाहीर केले होते. त्यानंतर राज्य मंडळ दहावी आणि बारावीच्या परीक्षेचा निकाल कधी जाहीर करणार याकडे विद्यार्थी, पालकांचे लक्ष लागले होते. त्यानुसार आता राज्य मंडळाकडून गुरुवारी (२५ मे) बारावीचा निकाल दुपारी दोन वाजता ऑनलाइन जाहीर करण्यात येणार आहे. निकालानंतर लगेचच राज्य मंडळाकडून श्रेणीसुधार परीक्षेची अर्ज प्रक्रियाही सुरू केली आहे. त्या बाबतची माहिती राज्य मंडळाने जाहीर केली आहे.निकाल जाहीर झाल्यानंतर २६ मे ते ५ जूनपर्यंत विद्यार्थ्यांना गुण पडताळणीसाठी वेबसाईटवर अर्ज करता येणार आहे. उत्तर पत्रिकेच्या छायाप्रतीसाठी ६ मे ते १४ जून दरम्यान ऑनलाईन अर्ज करता येणार आहेत. विद्यार्थ्यांना ५ जून रोजी महाविद्यालयात गुणपत्रिका मिळणार आहे.

बच्चू कडूंना कॅबिनेट मंत्रीपदाचा दर्जा

✔ **पुणे** : आमदार बच्चू कडू यांची दिव्यांग विभागाच्या 'दिव्यांग कल्याण विभाग मंत्रालय दिव्यांगांच्या दारी' या लोककल्याणकारी उपक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक व अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे. मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार बच्चू कडू यांना मंत्रीपदाचा दर्जा जाहीर झाला आहे. शासनाने परिपत्रक काढून बच्चू कडू यांना मंत्रीपदाचा दर्जा जाहीर केला आहे. यासाठी राज्यस्तरीय समिती गठित केली असून दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव, आयुक्त दिव्यांग कल्याण पुणे, उपसचिव हे सदस्य म्हणून काम पाहणार आहेत. गेल्या २० वर्षांपासून बच्चू कडू लढत आहेत. तसेच त्यांच्या अनेक प्रश्नांसाठी कडू यांनी आंदोलनेही केली आहेत.

देवेंद्रजी आलाच आहात तर शेतकऱ्यांचे अश्रू पुसूनच जावा

✔ सुराज्य/शिवाजी हळणवर

येणार... येणार... येणार... म्हणत, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अखेर सोलापूरला येण्यासाठी पाचव्यांदा मुहूर्त लागला आहे. यामुळे सर्वांच्याच आशा उंचावल्या आहेत. स्मार्ट सिटी योजनेसह विविध योजनेंतर्गत करण्यात आलेल्या विकास कामांच्या उद्घाटनासाठी गेल्या वर्षभरापासून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोलापूर दौऱ्याचे नियोजन करण्यात आले. मात्र विविध कारणास्तव आतापर्यंत सोलापूरचा त्यांचा नियोजित दौरा चारवेळा रद्द झाला. आज ते जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व कार्यकर्त्यांशी संवाद साधणार असून येथील महसूल भवन येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या उद्घाटन सोहळ्यासह महापालिकेची इंद्रभुवन इमारत, शहरातील शंभर बेडचे हॉस्पिटल आदी विकास कामांच्या उद्घाटनांसह अन्य लोकार्पणाचे कार्यक्रम त्यांच्या हस्ते होणार आहेत. हे होत असतानाच जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या रखडलेल्या प्रश्नावर ते बोलतील व 'देवेंद्रजी आलाच आहात तर शेतकऱ्यांना ही दिलासा देऊन जावा' अशी आर्त हाक शेतकऱ्यांतून दिली जात आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या दौऱ्यावर शेतकऱ्यांच्या अपेक्षा

शेतकऱ्यांना कर्जमाफीचे घोषणा करीत राज्यातील आत्तापर्यंतच्या सर्वच सरकार दीर्घकाळ झुलवत ठेवत आहेत. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना जाहीर केलेले पन्नास हजारांचे प्रोत्साहनपर अनुदान आजमितीस पन्नास टक्के शेतकऱ्यांनाही मिळालेलेच नाही. ते कधी मिळणार आणि कर्जमाफीची मर्यादा दोन लाख होऊन उरलेले कर्ज भरून माफीचा लाभ घेऊ पाहणारे असे सर्वच शेतकरी आजही या मदतीच्या प्रतीक्षेत आहेत.

उजनीतून पुणे जिल्ह्यातील बारामती, इंदापूरला उचल पाणी नेण्यासाठी आघाडी सरकारने घेतलेला निर्णय बदलण्याची मागणी शेतकरी करीत आहेत. जिल्ह्यातील गळीत हंगामाची सांगता होऊन साडेतीन महिने उलटून गेले. एफआरपी कायद्यानुसार १४ दिवसात शेतकऱ्यांना उसाचे पैसे देणे बंधनकारक असताना या कायद्याचा धाक नसल्यामुळेच व साखर आयुक्तांच्या कारखानदार धार्जिण्यावृत्तीमुळे साखर कारखानदारांनी शेतकऱ्यांचे ३६८.५१ कोटी रुपये थकविले आहेत. जिल्ह्यात खाजगी दूध संघांनी दर ३ -४ रुपयांनी घटविले आहेत. त्यामुळे शेतकरी आंदोलने करीत असून या उत्पादकांना न्याय देण्यासाठी शासनाने दुधाला 'एफआरपी' (रास्त आणि किफायतशीर) देण्याबाबत आता गांभीर्याने विचार करायला हवा. सोलापूर जिल्ह्यातील आठ तालुक्यातील १०४ गावांमध्ये गारपीट व पावसामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले यामध्ये सुमारे ३ हजार ४६९ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले असून ४ हजार ५०० शेतकरी हे बाधित झाले आहेत.

दूध उत्पादक अडचणीत

सध्या दुधाचे दर कमी झालेत, तर जनावरांच्या चाऱ्यांचे दर मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. सध्या कडक उन्हाळा असल्याने उष्णतेमुळे जनावरे दूध देण्याचे प्रमाण घटले आहे. दिवसातून एक वेळ तरी हिरवा चारा त्यांना द्यावा लागतो. मात्र सध्या चारा विकत घेऊन जनावरांना घालणे म्हणजे मोठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. दुग्ध व्यवसाय हा मुख्य व्यवसाय असल्याने जनावरांची संख्याही वाढती आहे. त्यामुळे पशुखाद्या सह त्यांना हिरवी मका, कडवळ, ऊस, खापरी पेंड, मका भरडा, आधी चारा द्यावा लागतो. दुधाचे पैसे व चाऱ्याच्या खरेदीची पैशाचा हिशोब केला तर हातात काहीच शिल्लक राहत नाही. केवळ शेतीला खत म्हणून जनावरांपासून मिळणाऱ्या शेणा वरच समाधान मानावे लागते. त्यामुळे हरभरे खाल्ले हात कोरडे अशी अवस्था दूध उत्पादकाची झाली आहे.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



तीर्थक्षेत्र विकास पूर्णत्वास जाओ !!

कल्याण
569-06-367

मेन बाजार
166-37-124



महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री
मा.ना.देवेंद्रजी फडणवीस साहेब
यांचे हुतात्मा नगरीमध्ये भव्य स्वागत...

आपला नम्र : प्रा.लक्ष्मण ढोबळे
प्रांतिक सदस्य, भाजप

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
॥ निमंत्रण पत्रिका ॥

सोलापूर महानगरपालिका व सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि.यांचे वतीने विकसीत केलेल्या प्रकल्पांचा लोकार्पण सोहळा

✻ शुभहस्ते ✻
मा.ना.श्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

✻ कार्यक्रमाचे अध्यक्ष ✻
मा.ना.राधाकृष्ण एकनाथराव विखे-पाटील
मंत्री, महसूल पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री सोलापूर जिल्हा.

✻ प्रमुख अतिथी ✻
मा.खा.श्री.ष.ब्र.डॉ.जयसिध्देश्वर शिवाचार्य महास्वामी
मा.खा.श्री. रणजितसिंह नाईक निंबाळकर
मा.खा.श्री. ओमप्रकाश राजेनिंबाळकर

मा.आ.श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील
मा.आ.श्री.सुभाष देशमुख
मा.आ.कु. प्रणिती शिंदे
मा.आ.श्री.संजयमामा शिंदे
मा.आ.श्री.सचिन कल्याणशेट्टी
मा.आ.श्री.अरुण लाड
मा.आ.श्री.बबनराव शिंदे
मा.आ.श्री.शहाजी पाटील
मा.आ.श्री.यशवंत माने
मा.आ.श्री.राम सातपुते
मा.आ.श्री.जयंत आसगांवकर
मा.आ.श्री.विजय देशमुख
मा.आ.श्री.राजेंद्र राऊत
मा.आ.श्री.समाधान आवताडे

✻ यांचे सन्मानीय उपस्थितीत ✻
गुरुवार दि. २५ मे २०२३ रोजी दुपारी २.00 वाजता
हुतात्मा स्मृती मंदिर येथे संपन्न होत आहे.
सदर कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

✻ विनित ✻
श्री.आसीम गुप्ता (भा.प्र.से)
प्रधानसचिव (मदत व पुनर्वसन)
महसूल विभाग मंत्रालय, मुंबई तथा
अध्यक्ष सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि.

शीतल तेली-उगले (भा.प्र.से)
आयुक्त, सोलापूर महानगरपालिका तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि.

✻ लोकार्पण होणारे विविध प्रकल्प ✻
✻ इंदिरा गांधी स्टेडियम व विविध खेळांच्या मैदानाचे विकास कामे
✻ मरिआई चौक येथील सिटी एक्झीबिशन सेंटरचे विकास काम
✻ इंद्रभवन महानगरपालिका प्रशासकीय इमारतीचे सुशोभीकरण
✻ राणी लक्ष्मीबाई मंडई इमारतीचे सुशोभीकरण करणे.

सहर्ष स्वागत!
साहेब आपले

संकल्प महाविजय!

विकासाचे मेरुमणी, महाराष्ट्राचे लाडके नेते,
कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री, गृहमंत्री
मा.ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस
यांचे श्री सिद्धरामेश्वरांच्या पुण्यभूमीमध्ये सहर्ष स्वागत!

शहराध्यक्ष
पालकमंत्री
जिल्हाध्यक्ष

स्वागतोत्सुक: भारतीय जनता पार्टी सोलापूर शहर व ग्रामीण जिल्हा

लोकार्पण
नुतन जिल्हाधिकारी कार्यालय
महसुल भवन
गुरुवार, दि.२५ मे २०२३
वेळ: दुपारी १२.३० वा.
पत्ता: शासकीय दूध डेअरी जवळ, सात रस्ता, सोलापूर

महापालिका विकासकामांचे लोकार्पण
सोमपा व स्मार्ट सिटी कार्पोरेशन यांनी विकसीत केलेल्या कामांचे लोकार्पण
गुरुवार, दि.२५ मे २०२३
वेळ: दुपारी ०२.०० वा.
पत्ता: हुतात्मा स्मृती मंदीर सोलापूर

कार्यकर्ता संमेलन
भारतीय जनता पार्टी
कार्यकर्ता संमेलन
गुरुवार, दि.२५ मे २०२३
वेळ: दुपारी ०३.३० वा.
पत्ता: दि. हेरीटेज लॉन, गांधी नगर, सोलापूर

डिझाईन फॅक्टरी